आर्थिक वर्ष सन २०१८-१९ साठी महनिर्मिती कंपनीच्या भुसावळ १x६६० मे.वॅ.प्रकल्पासाठी मंजूर असलेले भागभांडवल वितरीत करण्याबाबत.

महाराष्ट्र शासन
ऊद्योग, ऊर्जा व कामगार विभाग
शासन निर्णय क्र. निधिवि-२०१९/प्र.क्र.४(१) /ऊर्जा-३
मादाम कामा मार्ग, हुतात्मा राजगुरु चौक,
मंत्रालय, मुंबई - ४०० ०३२.
दिनांक : - २७ मार्च, २०१९

संदर्भ :- १. शासन निर्णय, उद्योग, ऊर्जा व कामगार विभाग क्र. प्रकल्प-२०१०/प्र.क्र.३/उर्जा-४ दिनांक ५.१०.२०१०
२. शासन निर्णय, उद्योग, ऊर्जा व कामगार विभाग क्र. निधीवी-२०१९/प्र.क्र.४/उर्जा-३ दिनांक १ फेब्रुवारी, २०१९.
३. वित्त विभाग शासन परिपत्रक क्र. अर्थसं-२०१८/प्र.क्र.६९/अर्थ-३, दि. ०२.०४.२०१८
४. वित्त विभाग शासन परिपत्रक क्र. अर्थसं-२०१८/प्र.क्र.६९/अर्थ-३, दि. २५.१.२०१९
५. महानिर्मितीचे पत्र क्र.CMD/MSPGCL/No. १४५५७ दि.२०.१२.२०१८

प्रस्तावना :-

भुसावळ औष्णिक बदली प्रकल्पास संदर्भिय शासन निर्णय क्र. १ अन्वये मान्यता दिली आहे. सदर प्रकल्पाचा एकूण खर्च रु. ४२९० कोटी इतका असून त्यापैकी २०% शासनाचे भागभांडवल म्हणून रु. ८५८ कोटी इतक्या रक्कमेस संदर्भिय शासन निर्णय क्र. १ अन्वये मंजूरी देण्यात आली आहे. त्यापैकी संदर्भिय शासन निर्णय क्र.२ अन्वये वितरीत केलेले भागभांडवल रू. ३०.२४ कोटी धरून एकूण भागभांडवल रू. ७३.५९०१ कोटी वितरीत करण्यात आले आहे.

२. सन २०१८-१९ करिता संदर्भिय शासन निर्णय क्र. २ अन्वये वितरीत केलेले भागभांडवल रू. ३०.२४ कोटी वजा जाता शिल्लक भागभांडवल रू. १२.९६ कोटी महानिर्मिती कंपनीस रोखीने वितरीत करण्याची बाब शासनाच्या विचाराधीन होती.

शासन निर्णय :-

भुसावळ औष्णिक विद्युत प्रकल्पाच्या बदली प्रकल्पाचे नूतनीकरण व आधुनिकीकरण करण्यासाठी राज्य शासनाची भांडवली गुंतवणुक रू. १२,९६,००,०००/- (रु.बारा कोटी शाहन्नव लाख फक्त ) इतकी रक्कम महाराष्ट्र राज्य विद्युत निर्मिती कंपनी मर्यादित यांना वितरीत करण्यास या शासन निर्णयाव्दारे मंजूरी देण्यात येत आहे.

२. या शासन निर्णयान्वये मंजूर करण्यात आलेल्या भागभांडवलाची रक्कम ज्या कारणासाठी मंजूर करण्यात आलेली आहे त्याच कारणासाठी उपयोगात आणली जाईल याची खातरजमा महानिर्मिती कंपनीने करावी.

३. वरील बाबीचा खर्च "मागणी क्र.के-११ मुख्यलेखाशिर्ष ४८०१ वीज प्रकल्पावरील भांडवली खर्च ०२ औष्णिक विद्युत निर्मिती,१९० सार्वजनिक क्षेत्रातील व इतर उपक्रमातील गुंतवणुका, (००) (०३) भुसावळ औष्णिक विद्युत प्रकल्पाच्या बदली प्रकल्पामध्ये भांडवली गुंतवणुक (४८०१ ३७३१) ५४ गुंतणुक" या लेखाशिर्षाखाली सन २०१८-१९ करिता मंजूर असलेल्या सुधारित अंदाज रू. ४३.२० कोटी मधून खर्ची टाकण्यात यावा.

४. सदर रक्कम अधिदान व लेखाधिकारी यांच्यामार्फत कोषागारातून काढून महाराष्ट्र राज्य विद्युत निर्मिती कंपनी मर्यादित, मुंबई यांना अदा करण्यासाठी आहरण व संवितरण अधिकारी म्हणून अवर सचिव (ऊर्जा-३) व नियंत्रण अधिकारी म्हणून सह सचिव (ऊर्जा-३) उद्योग, ऊर्जा व कामगार विभाग, मंत्रालय, मुंबई यांना प्राधिकृत करण्यात येत आहे. महानिर्मितीस कंपनीस मंजूर झालेली रक्कम रू. १२,९६,००,०००/- (रु.बारा कोटी शाहन्नव लाख फक्त ) अधिदान व लेखाधिकारी, मुंबई येथून महाराष्ट्र राज्य विद्युत निर्मिती कंपनी यांच्या नावे स्वतंत्ररित्या धनादेश काढून वितरीत करण्याची कार्यवाही करावी.

५. शासनाने महाराष्ट्र राज्य विद्युत निर्मिती कंपनी मर्यादित या कंपनीमध्ये केलेली सदर भांडवली गुंतवणूक ही महाराष्ट्र राज्य विद्युत मंडळ सूत्रधारी कंपनी मर्यादित मार्फत केलेली भांडवली गुंतवणुक समजण्यात यावी. महाराष्ट्र राज्य विद्युत निर्मिती कंपनीने सदर रकमेच्या दर्शनी मूल्या इतके समभाग महाराष्ट्र राज्य विद्युत मंडळ सूत्रधारी कंपनी मर्यादित या कंपनीच्या नावे वितरीत करावेत.

६. वित विभागाच्या दिनांक ०२.०४.२०१८ च्या परिपत्रकातील परिच्छेद क्रमांक-७ मधील अट क्र.१ ते ९ लागू होत नसल्याचे प्रमाणित करण्यात येत आहे. तसेच परिपत्रकाच्या सोबतच्या परिशिष्टातील अ.क्र.१ ते ७ च्या अटी लागू होत नाहीत. अ.क्र.८ मधील ५४ गुंतवणुका या अटीच्या अनुषंगाने तपासणी सूचीतील अट क्रमांक १ व ३ या अटींची पूर्तता होत असल्याचे प्रमाणित करण्यात येत आहे. उर्वरित अटी लागू होत नाही. तसेच सदर खर्च वित्त विभागाने सन २०१८-१९ साठी मंजूर केलेल्या सुधारित

अंदाजाच्या मर्यादेत असून प्रशासकीय विभागास देण्यात आलेल्या अधिकारात प्रधान सचिव (ऊर्जा) यांच्या मान्यतेने सदर शासन निर्णय निर्गमित करण्यात येत आहे.

७. या लेखाशिर्षाखाली निधी वितरीत करण्यासाठी सादर करण्यात आलेल्या देयकाच्या अनुषंगाने प्रमाणित करण्यात येते की, या लेखाशिर्षाखाली कोणतेही संक्षिप्त देयक प्रलंबित नाही. तसेच उपयोगिता प्रमाणपत्र प्रलंबित नाही.

८. सदर शासन निर्णय महाराष्ट्र शासनाच्या www.maharashtra.gov.in या संकेतस्थळावर उपलब्ध करण्यात आला असून त्याचा सांकेतांक क्र. २०१९०३२७१२२९०१७५१० असा आहे. हा आदेश डिजीटल स्वाक्षरीने सांक्षाकीत करून काढण्यात येत आहे.

महाराष्ट्राचे राज्यपाल यांच्या आदेशानुसार व नावाने.

Nitin Gaikwad

Digitally signed by Nitin Gaikwad
DN: c=IN, o=Government Of Maharashtra, ou=Industry Energy and Labour Department, postalCode=400032, st=Maharashtra,
2.5.4.20=5892c3fd8686c1921e784a3faa9688d155b03f5591ce11b21a1b500624776972, serialNumber=2276ac762af372d872c2f01d5bb5086166f4a6e20a1bdf9762d556a93f5d118e, cn=Nitin Gaikwad
Date: 2019.03.27 12:31:54 +05'30'

(नितीन गायकवाड)
अवर सचिव, महाराष्ट्र शासन

प्रत:-

१) अध्यक्ष व व्यवस्थापकीय संचालक, महाराष्ट्र राज्य विद्युत मंडळ सूत्रधार कंपनी मर्यादित, हाँगकाँग बँक बिल्डिंग, फोर्ट, मुंबई.
२) अध्यक्ष व व्यवस्थापकीय संचालक, महाराष्ट्र राज्य विद्युत निर्मिती कंपनी मर्यादित, प्रकाशगड, वांद्रे, (पूर्व), मुंबई-५१
३) मा. विरोधी पक्ष नेता, विधानपरिषद / विधानसभा, विधान भवन, मुंबई
४) महालेखापाल (लेखा अनुज्ञेयता), महाराष्ट्र-१, मुंबई-४०००२०.
५) महालेखापाल (लेखा परिक्षा), महाराष्ट्र-१, मुंबई-४०००२०.
६) महालेखापाल (लेखा व अनुज्ञेयता), महाराष्ट्र-२, नागपूर.
७) अधिदान व लेखा अधिकारी, अराप / रालेवि-१), चर्चगेट, मुंबई.
८) अधिदान व लेखा अधिकारी, अधिदान व लेखा कार्यालय, वांद्रे,मुंबई.
९) निवासी लेखा अधिकारी, वांद्रे (पूर्व), मुंबई-४०००५१.
१०) कक्ष अधिकारी (रोखशाखा) उद्योग, ऊर्जा व कामगार विभाग, मंत्रालय, मुंबई-३२.
११) वित्त विभाग, (अर्थसंकल्प-१४ / साधनसंपत्ती / साऊ / व्यय-१६) मंत्रालय, मुंबई-३२.
१२) निवडनस्ती (ऊर्जा-३), उद्योग, ऊर्जा व कामगार विभाग, मंत्रालय, मुंबई ३२.